# शिक्षण विभाग(प्राथ) जिल्हा परिषद, नाशिक

एबीबी सर्कल,त्रबंकरोड ,नशिक ४२२००७

जा ,क्र जिपना/शिक्षण/प्राथ-१२/235/२०२५

दिनांक :30 /१२/२०२५

प्रति,

.....................................

.....................................

.....................................

**विषय:** जिल्हा वार्षिक योजना सन 2025-26 नाविन्यपूर्ण योजनेअंतर्गत नाशिक जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळेचे वर्ग इयत्ता चौथी व सातवी मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना आधुनिक मोबाईल ॲप द्वारे शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे कामी दर पत्रक सादर करणेबाबत.

संदर्भ:१) उद्योग ऊर्जा व कामगार विभाग यांचे खरेदी संदर्भातील शासन निर्णय क्र.भाखस -२०१४ प्र.क्र.८२/भाग ३/ उद्योग -४ दि-०१.१२.२०१६

२) उद्योग ऊर्जा व कामगार विभाग यांचे खरेदी संदर्भातील शासन निर्णय क्र.भाखस -२०२१ प्र.क्र.८/ उद्योग -४ दि-०७.०५.२०२१

३) जिल्हा नियोजन समिती ,जिल्हाधिकारी कार्यालय कडील प्रशासकीय मान्यता आदेश क्र.जिनिस/O/२०२५/dec/AAO/०७५२२ दि.०६.१२.२०२५

४) शिक्षण प्राथमिक शिक्षण संचालनालय, कार्यालय कडील तांत्रिक मान्यता आदेश प्राशिस/१०४/नाशिक/ता.मा/२१४/२०२५ दि.०६.११.२०२५

उपरोक्त संदर्भ विषयान्वये कळविण्यात येते की, शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद नाशिक कार्यालय मार्फत जिल्हा परिषद नाशिक व्यवस्थापनाच्या शाळेमध्ये जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ नाविन्यपूर्ण योजने अंतर्गत नाशिक जिल्ह्यातील चोवीस हजार विद्यार्थी संख्येकरिता जिल्हा परिषद प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेतील इयत्ता चौथी व इयत्ता सातवी मध्ये शिक्षण घेत असलेला विद्यार्थ्यांना आधुनिक मोबाईल ॲप द्वारे शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता संदर्भात क्र.३ व ४ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

शासन निर्णय दिनांक-१७.१०.२०२५ अन्वये प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता चौथी व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता सातवी माहे एप्रिल २०२६ मध्ये घेण्याचे प्रयोजन केले आहे. नाशिक जिल्ह्यातील जि.प व्यवस्थापनाच्या इयत्ता चौथी व सातवी मध्ये शिकत असलेले विद्यार्थी शिष्यवृत्ती मुख्य परीक्षेमध्ये पात्रता प्रमाण वाढविणे व शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी प्रमाण वाढविणे करता मोबाईल ॲप माध्यमातून शिष्यवृत्ती परीक्षा सराव करून घेण्यासाठी संदर्भ क्र.१ अन्वये सोबतच्या तांत्रिक विवरणानुसार खालील अटी शर्तीच्या अधीन राहून दर पत्रक मागणी करण्यात येत आहे.

अटी व शर्थी -

१) उपरोक्त दरपत्रके मा.शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद नाशिक, एबीबी सर्कल,त्रंबक रोड, नाशिक येथे दि.०५.०१.२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत बंद लिफाफ्यात सादर करण्यात यावे.

२) दरपत्रक ठरवून दिलेल्या वेळेमध्ये प्राप्त न झाल्यास त्याचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

३) संदर्भ क्र.१ व २ शासन निर्णयान्वये खरेदी प्रक्रिया करण्यात येणार आहे त्याबाबत निम्न स्वाक्षरीकार यांना संपूर्ण अधिकार राखून ठेवण्यात आलेला आहे.

सोबत-तांत्रिक विवरण

( सरोज जगताप )

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**

**जिल्हा परिषद नाशिक**

प्रत.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक यांना माहितीस्तव सविनय सादर.

Scanned with OKEN Scanner

# तांत्रिक विवरण

<table>
<tr><td colspan="3">तपशिल</td><td>खरेदीची रक्कम प्रति विद्यार्थी</td></tr>
<tr><td colspan="3">नाशिक जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेतील प्रायोगिक तत्वावर इयत्ता चौथी व इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासनाच्या शिष्यवृत्ती परीक्षेसाठी तयार करणे.</td><td></td></tr>
<tr><td>Sr. No.</td><td>Particulars</td><td>Quantity</td><td rowspan="5"></td></tr>
<tr><td>A</td><td>Mobile App for Marathi medium students of classes 4th, and 7th to cover the syllabus of the Maharashtra State Scholarship Exam to provide:<br>1. 150+ Video Lectures without ads plus Notes & Quizzes<br>2. AI-based Doubt solving<br>3. AI-based Personalized practice<br>4. 18 Practice & 6 Ranking exams</td><td rowspan="4">24000</td></tr>
<tr><td>B</td><td>Mobile App for Class Teachers:<br>1. Training on the syllabus of the Maharashtra State Scholarship Exam with certification<br>2. Doubts and exam result analysis of their students</td></tr>
<tr><td>C</td><td>Mobile App for Administration:<br>1. At the District level<br>2. At the Block level<br>3. At the Cluster level<br>4. At the School level<br>5. At the Class level<br><br>A reporting system of app-based learning for:<br>1. Real-time monitoring<br>2. Cumulative reporting<br>3. Day-wise reporting<br>4. Overall, lecture-wise & exam-wise reporting<br>5. B2B Result analysis at all levels<br>6. Academic audit of students' exam results at all levels<br>7. Single database (with option to edit at higher level) of Students, Class Teachers, HMs, Cluster Heads, BEOs mobile no.<br>8. Review calls reporting at all levels</td></tr>
<tr><td>D</td><td>Printing of 9 Mock exams for the Maharashtra State Scholarship Exam paper with OMR sheets and attendance sheets with school-wise packing and distribution and collation at the taluka level and result processing of OMR sheets at the district level.</td></tr>
</table>

( सरोज जगताप )
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद नाशिक

Scanned with OKEN Scanner